# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.07.2025** **वार-सोमवार**

---

**रेशन**

अन्न धान्य वितरणातील गैरप्रकार टाळले जावेत आणि कारभार सुरळीत व्हावा, याकरीता पुणे शहरासाठी पूर्णवेळ अन्नधान्य वितरण अधिका-याची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली. अन्न धान्य वितरणाशी संबंधित वेबसाईट सुरळीत चालत नाही आणि ती खूप संथ असते आणि बऱ्याचदा बंदही असते, त्यामुळं नवीन रेशन कार्ड काढणं, त्यामध्ये दुरुस्ती करणं अशी कामं होत नाहीत, अशी माहिती शिरोळे यांनी सभागृहाला दिली. पुणे शहरातील काही रेशन दुकानातून ग्राहकांना सिमेंटमिश्रित गहू आणि तांदूळ वितरीत करण्यात येत असल्याचा प्रकार अलिकडं घडल्याचंही आमदार शिरोळे यांनी नमूद केलं.

**जिओटॅगिंग**

फळपीक विमा योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी 'जिओ टॅगिंग' यंदा सक्तीनं तपासलं जाणार आहे अशी माहिती पुण्याचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी दिली आहे. फळबागेचं क्षेत्र ई-पीकपाहणीसोबत न जुळल्यास विमा अर्ज रद्द होणार आहे. फळपीक विमा योजनेत मृग बहारासाठी अर्ज दाखल करण्याची काही पिकांची अंतिम मुदत संपली आहे, परंतु संबंधित शेतकऱ्यांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडं पाठविण्यात आला असल्याचं ते म्हणाले.

**आदिवासी**

आदिवासींनी आपली बलस्थानं ओळखून विविध क्षेत्रात प्रगतीची भरारी मारली पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ लेखक, डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी आज पुण्यात व्यक्त केली. आदिवासी साहित्य आणि संस्कृती संवर्धन संस्था, बल्लारपूर आणि विदिशा विचार मंच, पुणे यांच्याद्वारे आयोजित आठव्या आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलनाचं उद्घाटन करताना डॉक्टर सबनीस अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. आदिवासी स्त्री पुरुष चिवट आहेत. त्यांच्यातील दुर्दम्य आशावाद हे आदिवासींचं जीवन रहस्य असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं. या संमेलनाचं उद्घाटन महाराष्ट्र साहित्य

परिषद, पुणेचे कार्याध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांच्या हस्ते ग्रंथपूजन आणि माडियांच्या हाकुमी या वाद्याच्या वादनानं झालं. प्रारंभी मान्यवरांच्या उपस्थितीत हलगीच्या तालावर ग्रंथदिंडी काढण्यात आली. तसंच महाराष्ट्र गीत आणि गोंडी भाषेतील गीत सादर करण्यात आलं.

**कसबा**

पुण्याचं ग्रामदैवत श्री कसबा गणपती मंदिराच्या पहिल्या मजल्याच्या जतन आणि संवर्धनासाठी जिल्हा नियोजन निधीतून ४० लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, या कामाचा शुभारंभ आज मंदिर परिसरात आमदार हेमंत रासने यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. या निधीमुळं मंदिराच्या पहिल्या मजल्याचं ऐतिहासिक मूल्य जपत सुरक्षित जतन आणि देखभाल होणार असल्याचं रासने यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं. श्री कसबा गणपती मंदिर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून मानाचा गणपती मानलं जात असून, हे मंदिर आपल्या परंपरेचं प्रतीक असल्याचं ते म्हणाले.

**खडकवासला**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत आज सकाळी सहा वाजेपर्यंत 19 टीएमसी म्हणजे 65 टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा 21 टक्के होता. खडकवासला धरणातून नदीपात्रात आज सकाळी आठ वाजता पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला अशी माहिती पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता मोहन भदाणे यांनी दिली.

**डेंग्यू**

पुणे शहरातील डेंग्यूचे रूग्ण वाढत असून, गेल्या पाच महिन्यांत नोंदवलेल्या रुग्णसंख्येइतकी रुग्णसंख्या एकट्या जूनमध्ये नोंदवली गेली. यामुळं नागरिकांनी डासांची पैदास होणारी ठिकाणं नष्ट करावी, स्वच्छता पाळावी असं आवाहन महानगरपालिकेनं केलं आहे. जानेवारीपासून जून महिन्यापर्यंत डेंग्यू रूग्णांची संख्या १२३ वर पोहोचली. जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात ११ नवीन रूग्ण सापडले. गेल्या आठवड्यात चिकनगुनियाचे दोन संशयित रूग्ण सापडले. त्यामुळे लक्षणं दिसताच तत्काळ डॉक्टरांच्या सल्ल्यानं उपचार घेण्याचं आवाहन महानगरपालिकेचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉक्टर राजेश दिघे यांनी केलं आहे.

**श्रद्धांजली**

संगीत क्षेत्रातील लोकप्रिय कलावंत श्रीपाद सोलापूरकर, सुशील शिरसाट आणि ईक्बाल दरबार या कलाकारांनी जात-धर्म-पंथ या पलिकडं जाऊन संगीतसेवा केली, अशा शब्दांत संगीत क्षेत्रातील कलाकारांनी आज त्यांना पुण्यात श्रद्धांजली वाहिली. सातत्य आणि साधनेची परंपरा लाभलेल्या या गायक-वादकांनी कलाकाराला सन्मान मिळावा या करिता प्रयत्न केले अशी भावना वक्त्यांनी यावेळी व्यक्त केली. पूना गेस्ट हाऊस स्नेह मंच आणि श्री तुळशीबाग सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्टतर्फे आज या श्रद्धांजली सभेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश साधारण ढगाळ राहून पावसाच्या मध्यम सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 28 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**